Government of Karnataka

# माय - मराठी

## Marati First Language

1

### 1st Standard

Text Cum Work Book



**Karnataka Text Book Society®**
100 Ft. Ring Road, Banashankari, III Stage
Bengaluru-560085

# Preface

The Textbook Society, Karnataka has been engaged in producing new textbooks according to the new syllabi prepared which in turn are designed based on NCF - 2005 since June 2010. Textbooks are prepared in 11 languages; seven of them serve as the media of instruction. From standard 1 to 4 there is the EVS and 5th to 10th there are three core subjects namely mathematics, science and social science.

NCF - 2005 has a number of special features and they are:

- Connecting knowledge to life activities
- Learning to shift from rote methods
- Enriching the curriculum beyond textbooks
- Learning experiences for the construction of knowledge
- Making examinations flexible and integrating them with classroom experiences . Caring concerns within the democratic policy of the country
- Make education relevant to the present and future needs.
- Softening the subject boundaries integrated knowledge and the joy of learning.
- The child is the constructor of knowledge

The new books are produced based on three fundamental approaches namely.

Constructive approach, Spiral Approach and Integrated approach

The learner is encouraged to think, engage in activities, masters skills and competencies. The materials presented in these books are integrated with values. The new books are not examination oriented in their nature. On the other hand they help the learner in the total development of his/her personality, thus help him/her become a healthy member of a healthy society and a productive citizen of this great country India.

The Textbook Society expresses grateful thanks to the chairpersons, writers, scrutinisers, artists, staff of DIETs and CTEs and the members of the Editorial Board and printers in helping the Text Book Society in producing these textbooks.

**Prof. G.S. Mudambadithaya**
Co-ordinator
Curriculum Revision and Textbook Preparation
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

**Nagendra Kumar**
Managing Director
Karnataka Textbook Society®
Bengaluru, Karnataka

# हितगुज

मित्रहो,

भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये अत्याधुनिकता आणण्यासाठी आणि शिक्षण अधिकाधिक बालकेंद्रित करण्यासाठी नवनवीन पद्धतींचा अवलंब केला जात आहे. पंचवार्षिक योजनांप्रमाणे विशिष्ट टप्प्यावर शैक्षणिक सुधारणांचे पुनरावलोकन करून वेळोवेळी विधायक बदलही केले जात आहेत. अर्थात शैक्षणिक सुधारणा करताना अलिकडच्या पंचवीस वर्षात 'समान राष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रम' राबविण्यात आला याची भारतवासीयांनी आवर्जून दखल घ्यायला हवी असे सांगावेसे वाटते.

सन १९८६ मध्ये 'नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' स्वीकारून शिक्षण पद्धतीत राष्ट्रीय समानतेचा पाया घातला गेला. १९९८ पासून संपूर्ण देशभर 'सामर्थ्यावर आधारित शिक्षण' या सुधारित योजनेचा प्रारंभ झाला आणि सुशिक्षित विद्यार्थ्यांना किमान सामर्थ्ये प्राप्त करून देण्याची जबाबदारी एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून शिक्षक बंधू भगिनीनी स्वीकारली आहे असे दिसून येते.

बदलत्या काळाप्रमाणे आपण स्वतःच्या राहणीमान, आचार विचारात बदल करत असतो. शिक्षणक्षेत्र त्याला अपवाद नाही. अत्याधुनिकता आत्मसात करणे, नव विचार घेऊन पुढे जाणे. हा तर 'विद्या सरितेचा' स्थायीभाव आहे. बदल म्हणण्यापेक्षा समाजाभिमुख असलेले समाजोपयोगी 'नवविचार' ही काळाची गरज असते. राष्ट्रीय पातळीवर या नवविचाराचे मंथन निरंतर होत असते. या विचारमंथनातून तयार होणारे 'नवनीत' बालविकासाला पुष्टिकर असेल अशी आशा मनी बाळगून २००५ मध्ये 'अभ्यासक्रमाची राष्ट्रीय चौकट' तयार करण्यात आली. एन.सी.इ.आर.टी मध्ये तयार झालेल्या या राष्ट्रीय विचाराला 'एन.सी.एफ्-२००५' असे संबोधिण्यात आले आहे. एन.सी.एफ-२००५ बाबत विस्ताराने शिक्षकमार्गदर्शिकेत माहिती दिलेली आहेच. तथापी या 'नॅशनल करिक्युलम फ्रेम वर्क २००५' प्रमाणे तयार केलेले प्रस्तुत पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना 'राष्ट्रीय विचारांचे बीजारोपण' करीत आहोत असा पाठ्यपुस्तक मंडळाला ठाम विश्वास वाटतो.

सत्य आणि अहिंसेचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देणाऱ्या भगवान गौतम बुद्धांच्या या देशात महात्मा गांधीजीनी हा संदेश सर्वदूर पोहचविला. आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी या सारख्या गांधीवादी नेत्यांनी सत्य अहिंसेच्या विचारांची जोपासना केली.

सत्य अहिंसेच्या तत्त्वांवर दृढ विश्वास असणाऱ्या महात्मा गांधीजीनाही मानवी हक्कांसाठी 'छोडो भारत' सारखी चळवळ उभारून 'चलेजाव' चा नारा द्यावा लागला. स्वातंत्र्यासाठी 'करो या मरो' ही घोषणा द्यावी लागली. म्हणजेच कणखर व्हावे लागले हे ऐतिहासिक सत्य विसरून चालणार नाही.

'एन.सी.एफ'. 2005' मधून विचाराने, आचाराने कणखर आणि प्रतिभावान भारताच्या उभारणीचे बीजारोपण केले आहे.

शिक्षणाच्या या नवविचारातून प्रेरणा घेऊन भाषा, गणित, विज्ञान आणि विशेषतः समाजविज्ञान या सर्वच विषयातून एक प्रगल्भ राष्ट्रीय चेतना देण्याचे ध्येय 'भारतीय शिक्षणाने' उराशी बाळगले आहे. या राष्ट्रीय ध्येयाचा उद्देश 'बलसागर भारत होवो। विश्वात शोभुनी राहो' या पूज्य साने गुरुजींच्या शब्दात सांगून पाठ्यपुस्तक मंडळ आपले 'हितगुज' पूर्ण करीत आहे.

या राष्ट्रीय ध्येयाप्रत घेऊन जाण्यासाठी प्रस्तुत पाठ्यपुस्तक केवळ एक माध्यम आहे. वैचारिक बीजारोपणाचे ते एक साधन आहे. या साधनात सुधारणा करण्यासाठी सर्व शिक्षणप्रेमी नागरीक, शिक्षक बंधू-भगिनी व पालक बंधू भगिनींच्या विधायक सुचनांचे पाठ्यपुस्तक निर्देशनालयात स्वागत आहे. निर्देशनालयाच्या आदेशाप्रमाणे पुस्तक रचना समितीची यादी इंग्रजीमध्ये दिलेली आहे.

प्रस्तुत पाठ्यपुस्तकाच्या निर्मितीमध्ये श्रीमती उषाताई गोगटे गर्ल्स हायस्कूल बेळगावीचे मुख्याध्यापक श्री. एम्.के. मादार यांनी कार्यशाळांकरिता सभागृह आणि ग्रंथालय उपलब्ध करून दिले.

'बाल भारती' पुणे येथील मराठी विषयाचे विशेष अधिकारी प्रा. माधव राजगुरु यानी पाठ्यपुस्तक निर्मितीच्या कार्यात वेळोवेळी अमूल्य सल्ला दिला. लेखक व कवी यांची अनुमती मिळवून देण्याबाबत सहकार्य केले.

पाठ्यपुस्तक मंडळ या सर्वांचे अत्यंत आभारी आहे.

# TEXT BOOK COMMITTEE

## CHAIRMAN

**Shri. Madhav Kunte,** Ushatai Gogte Girls' High School, Belagavi.

## MEMBERS

**Shri. P.K. Muchandikar,** C.R.P. - Belgundi, Tal. & Dist., Belagavi.

**Shri. B.R. Patil,** Rtd. H.M. Govt. Hr. Pry. Marathi School, Uchagaon, Tal. & Dist. Belagavi.

**Shri. M.K. Birje,** H.M. Govt. Hr. Pry. Marathi School, Haragapurgad, Tal. Hukkeri, Dist. Belagavi.

**Shri A.S. Buvaji,** Govt. Hr. Pry. Marathi School, Jainkopp, Tal. Khanapur Dist., Belagavi.

## SCRUTINIZER

**Shri. B.P. Kamble (Sali),** Rtd. C.R.P. 103/2 Plot No. 14, "ACHAL NIVAS" Sambhaji Nagar, Vadgaon, Belagavi.

## ARTIST

**Shri. K.A. Badiger,** Art Master, Govt. High School, Awargol, Tal. Hukkeri, Dist. Belagavi.

## CHIEF CO-ORDINATOR

**Prof. G.S. Mudambadithaya,** Curriculum revision and text book preparation, Textbook Society. Bengaluru

## CHIEF ADVISERS

**Sri. Narasimaiah,** Managing Director, KTBS, Bengaluru.

**Sri. C. Nagamani,** Deputy Director, KTBS, Bengaluru.

## PROGRAMME CO-ORDINATOR

**Smt. Bhagyavathamma,** Assistant Director, KTBS Bengaluru.

# ಪರಿಷ್ಕರಣೆ ಕುರಿತು

ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಬಗ್ಗೆ ಪ್ರಕಟಗೊಂಡ ಸಾರ್ವಜನಿಕ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಗಮನಿಸಿ ಮಾನ್ಯ ಮುಖ್ಯಮಂತ್ರಿಯವರೂ ಅರ್ಥಸಚಿವರೂ ಆಗಿರುವ ಶ್ರೀ ಸಿದ್ದರಾಮಯ್ಯನವರು ತಮ್ಮ 2014–15 ರ ಬಜೆಟ್‌ನಲ್ಲಿ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ರಚಿಸುವ ಘೋಷಣೆ ಮಾಡಿದರು. ತಜ್ಞರು ಅನುಸರಿಸಬೇಕಾದ ಮೂಲ ಆಶಯವನ್ನು ಹೀಗೆ ಹೇಳಿದರು: "ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯ, ನೈತಿಕಮೌಲ್ಯಗಳು, ವ್ಯಕ್ತಿತ್ವವಿಕಸನ, ವೈಜ್ಞಾನಿಕ ಮತ್ತು ವೈಚಾರಿಕ ಮನೋಭಾವ, ಜಾತ್ಯತೀತತೆ ಮತ್ತು ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಬದ್ಧತೆಗಳಿಗೆ ಅನುವಾಗುವಂತೆ ತಜ್ಞರ ಸಮಿತಿಯನ್ನು ಪುನರ್ ರಚಿಸಲಾಗುವುದು" – ಇದು ಬಜೆಟ್ ಭಾಷಣದಲ್ಲಿ ಸಾದರಪಡಿಸಿದ ಆಶಯ.

ಆನಂತರ ಶಿಕ್ಷಣ ಇಲಾಖೆಯು ಒಂದರಿಂದ ಹತ್ತನೇ ತರಗತಿಯವರೆಗಿನ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಪರಿಷ್ಕರಣೆಗಾಗಿ 27 ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ದಿನಾಂಕ: 24.11.2014 ರಂದು ಆದೇಶಹೊರಡಿಸಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ವಿಷಯವಾರು ಮತ್ತು ತರಗತಿವಾರು ಮಾನದಂಡಕ್ಕನುಗುಣವಾಗಿ ರಚಿತವಾದವು. ವಿವಿಧ ಪಠ್ಯವಿಷಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರು, ಅಧ್ಯಾಪಕರು ಈ ಸಮಿತಿಗಳಲ್ಲಿದ್ದಾರೆ. ಈಗಾಗಲೇ ಲಿಖಿತವಾಗಿ ಬಂದಿರುವ ಅನೇಕ ಆಕ್ಷೇಪಗಳು ಮತ್ತು ವಿಶ್ಲೇಷಣೆಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಿ, ತಪ್ಪು ಒಪ್ಪುಗಳ ಬಗ್ಗೆ ನಿರ್ಣಯಿಸಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ ಹೊಣೆಹೊತ್ತ ಈ ಸಮಿತಿಗಳಿಗೆ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪಠ್ಯವಸ್ತುವನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸಿ ನಂತರ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಷ್ಕರಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು 24.11.2014ರ ಆದೇಶದಲ್ಲೇ ನೀಡಲಾಗಿತ್ತು. ಆನಂತರ 19.09.2015 ರಂದು ಹೊಸ ಆದೇಶ ಹೊರಡಿಸಿ 'ಅಗತ್ಯವಿದ್ದಲ್ಲಿ ಪುನರ್ ರಚಿಸುವ' ಸ್ವಾತಂತ್ರ್ಯವನ್ನು ನೀಡಲಾಯಿತು. ಹೀಗೆ ಸಮಗ್ರ ಪರಿಷ್ಕರಣೆಗೊಂಡ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು 2016–17 ರ ಬದಲು 2017–18ನೇ ಶೈಕ್ಷಣಿಕ ವರ್ಷದಲ್ಲಿ ಜಾರಿಗೊಳಿಸಲಾಗುವುದೆಂದು ಇದೇ ಆದೇಶದಲ್ಲಿ ತಿಳಿಸಲಾಯಿತು.

ಅನೇಕ ವ್ಯಕ್ತಿಗಳೂ ಸಂಘಟನೆಗಳೂ ಸ್ವಯಂಪ್ರೇರಿತರಾಗಿ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಮಾಹಿತಿದೋಷ, ಆಶಯದೋಷಗಳನ್ನು ಪಟ್ಟಿಮಾಡಿ ಶಿಕ್ಷಣ ಸಚಿವರಿಗೆ, ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘಕ್ಕೆ ಕಳುಹಿಸಿದ್ದರು. ಅವುಗಳ ಪರಿಶೀಲನೆಮಾಡಿದ್ದಲ್ಲದೆ, ಸಮಿತಿಗಳಾಚೆಗೆ ಅನೇಕ ಸಂವಾದಗಳನ್ನು ಏರ್ಪಡಿಸಿ ವಿಚಾರ ವಿನಿಮಯ ಮಾಡಿಕೊಂಡಿದ್ದೇವೆ. ಪ್ರಾಥಮಿಕ ಮತ್ತು ಪ್ರೌಢಶಾಲಾ ಅಧ್ಯಾಪಕರ ಸಂಘಗಳ ಜೊತೆ ಚರ್ಚಿಸಿದ್ದಲ್ಲದೆ ಪ್ರಶ್ನಾವಳಿ ಸಿದ್ಧಪಡಿಸಿ ಅಧ್ಯಾಪಕರಿಗೆ ಕಳಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಗಳನ್ನು ಸಂಗ್ರಹಿಸಲಾಗಿದೆ. ಅಧ್ಯಾಪಕರು, ವಿಷಯಪರಿವೀಕ್ಷಕರು ಮತ್ತು ಡಯಟ್ ಪ್ರಾಂಶುಪಾಲರ ಪ್ರತ್ಯೇಕ ಸಭೆಗಳನ್ನು ನಡೆಸಿ ವಿಶ್ಲೇಷಣಾತ್ಮಕ ಅಭಿಮತಗಳನ್ನು ಪಡೆಯಲಾಗಿದೆ. ವಿಜ್ಞಾನ, ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ, ಭಾಷೆ ಸಾಹಿತ್ಯಗಳಿಗೆ ಸಂಬಂಧಿಸಿದ ತಜ್ಞರಿಗೆ ಮೊದಲೇ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಕಳುಹಿಸಿ ಆನಂತರ ಸಭೆ ನಡೆಸಿ ಚರ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಮಹಿಳಾ ಸಂಘಟನೆ ಹಾಗೂ ವಿಜ್ಞಾನ ಸಂಬಂಧಿ ಸಂಸ್ಥೆಗಳನ್ನು ಆಹ್ವಾನಿಸಿ ಚಿಂತನೆ ನಡೆಸಲಾಗಿದೆ. ಹೀಗೆ ಎಲ್ಲಾ ಮೂಲಗಳಿಂದ ಪಡೆದ ಅರಿವಿನ ಆಧಾರದ ಮೇಲೆ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಅಗತ್ಯವಿದ್ದಕಡೆ ಪರಿಷ್ಕರಿಸಲಾಗಿದೆ.

ಬಹುಮುಖ್ಯವಾದ ಇನ್ನೊಂದು ಸಂಗತಿಯನ್ನು ಇಲ್ಲಿ ಹೇಳಬೇಕು. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ (N.C.E.R.T) ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ತೌಲನಿಕವಾಗಿ ಅಧ್ಯಯನ ಮಾಡಿ ಸಲಹೆಗಳನ್ನು ನೀಡಲು ವಿಜ್ಞಾನ, ಗಣಿತ ಮತ್ತು ಸಮಾಜವಿಜ್ಞಾನಕ್ಕೆ ಸಂಬಂಧಿಸಿದಂತೆ ತಜ್ಞರ ಮೂರು ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಲಾಯಿತು. ಈ ಸಮಿತಿಗಳು ನೀಡಿದ ತೌಲನಿಕ ವಿಶ್ಲೇಷಣೆ ಮತ್ತು ಸಲಹೆಗಳನ್ನು ಆಧರಿಸಿ ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟವನ್ನು ಹೆಚ್ಚಿಸಲಾಗಿದೆ. ಕೇಂದ್ರೀಯ ಶಾಲಾ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳಿಗಿಂತ ನಮ್ಮ ರಾಜ್ಯದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಗುಣಮಟ್ಟ ಕಡಿಮೆಯಾಗದಂತೆ ಕಾಯ್ದುಕೊಳ್ಳಲಾಗಿದೆ. ಜೊತೆಗೆ ಆಂಧ್ರ, ತಮಿಳುನಾಡು, ಮಹಾರಾಷ್ಟ್ರಗಳ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಜೊತೆ ನಮ್ಮ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳನ್ನು ಪರಿಶೀಲಿಸಲಾಗಿದೆ.

ಇನ್ನೊಂದು ಸ್ಪಷ್ಟನೆಯನ್ನು ನೀಡಲು ಬಯಸುತ್ತೇನೆ. ನಮ್ಮ ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿರುವುದು ಪರಿಷ್ಕರಣೆಯೇ ಹೊರತು ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸಮಗ್ರ ರಚನೆಯಲ್ಲ. ಆದ್ದರಿಂದ ಈಗಾಗಲೇ ರಚಿತವಾಗಿರುವ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕಗಳ ಸ್ವರೂಪಕ್ಕೆ ಎಲ್ಲಿಯೂ ಧಕ್ಕೆಯುಂಟುಮಾಡಿಲ್ಲ. ಲಿಂಗತ್ವ ಸಮಾನತೆ, ಪ್ರಾದೇಶಿಕ ಪ್ರಾತಿನಿಧ್ಯ, ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಸಮಗ್ರತೆ, ಸಮಾನತೆ, ಸಾಮಾಜಿಕ ಸಾಮರಸ್ಯಗಳ ಹಿನ್ನೆಲೆಯಲ್ಲಿ ಕೆಲವು ಪರಿಷ್ಕರಣೆಗಳು ನಡೆದಿವೆ. ಹೀಗೆ ಪರಿಷ್ಕರಿಸುವಾಗ ರಾಷ್ಟ್ರೀಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟು ಮತ್ತು ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಕ್ರಮ ಚೌಕಟ್ಟುಗಳನ್ನು ಮೀರಿಲ್ಲವೆಂದು ತಿಳಿಸಬಯಸುತ್ತೇನೆ: ಜೊತೆಗೆ ನಮ್ಮ ಸಂವಿಧಾನದ ಆಶಯಗಳನ್ನು ಅನುಸರಿಸಲಾಗಿದೆ. ಸಮಿತಿಗಳು ಮಾಡಿದ ಪರಿಷ್ಕರಣೆಯನ್ನು ಮತ್ತೊಮ್ಮೆ ಪರಿಶೀಲಿಸಲು ವಿಷಯವಾರು ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿಗಳನ್ನು ರಚಿಸಿ ಅಭಿಪ್ರಾಯಪಡೆದು ಅಳವಡಿಸಲಾಗಿದೆ.

ಹೀಗೆ ಕ್ರಮಬದ್ಧವಾಗಿ ನಡೆದ ಕೆಲಸಕ್ಕೆ ತಮ್ಮನ್ನು ತಾವು ಸಂಪೂರ್ಣ ತೊಡಗಿಸಿಕೊಂಡ 27 ಸಮಿತಿಗಳ ಅಧ್ಯಕ್ಷರು ಮತ್ತು ಸದಸ್ಯರನ್ನು ಹಾಗೂ ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನಾ ಸಮಿತಿಯ ಸಮಸ್ತರನ್ನು ಕೃತಜ್ಞತೆಯಿಂದ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಅಂತೆಯೇ ಸಮಿತಿಗಳ ಕೆಲಸ ಸುಗಮವಾಗಿ ನಡೆಯುವಂತೆ ವ್ಯವಸ್ಥೆಮಾಡಲು ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಅಧಿಕಾರಿಗಳಾಗಿ ನಿಷ್ಠೆಯಿಂದ ದುಡಿದ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘದ ಎಲ್ಲಾ ಅಧಿಕಾರಿಗಳನ್ನೂ ನೆನೆಯುತ್ತೇವೆ. ಸಹಕರಿಸಿದ ಸಿಬ್ಬಂದಿಗೂ ನಮ್ಮ ವಂದನೆಗಳು. ಅಭಿಪ್ರಾಯ ನೀಡಿ ಸಹಕರಿಸಿದ ಸರ್ವ ಸಂಘಟನೆಗಳು ಮತ್ತು ತಜ್ಞರಿಗೆ ಧನ್ಯವಾದಗಳು.

(ಎಂ.ಪಿ. ಮಾದೇಗೌಡ)
ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು-85

(ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ)
ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು
ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ
ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ)
ಬೆಂಗಳೂರು-85

# ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿಗಳ ವಿವರ

## ಸರ್ವಾಧ್ಯಕ್ಷರು

**ಪ್ರೊ. ಬರಗೂರು ರಾಮಚಂದ್ರಪ್ಪ** : ರಾಜ್ಯ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬೆಂಗಳೂರು.

## ಪರಿಷ್ಕರಣ ಸಮಿತಿ

### ಅಧ್ಯಕ್ಷರು

**ಶ್ರೀಮತಿ ಎಸ್.ವಿ. ದೇಶಪಾಂಡೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಆರ್.ಪಿ.ಡಿ ಕಾಲೇಜ್, ಬೆಳಗಾವಿ.

### ಸದಸ್ಯರು

**ಶ್ರೀಮತಿ ಕಿಶೋರಿ ಡಿ. ಜೋಷಿ** : ನಿವೃತ್ತ ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, G I ಬಾಗೇವಾಡಿ ಕಾಲೇಜು, ನಿಪ್ಪಾಣಿ.

**ಪ್ರೊ.ಎಸ್.ಎಸ್. ಚೌಹಾನ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು ಮರಾಠಿ ವಿಭಾಗ, ಮರಾಠಿ ಮಂಡಲ ಕಾಲೇಜು, ಬೆಳಗಾವಿ.

**ಶ್ರೀಮತಿ. ಅಲಕಾ ಮುತ್ಕೇಕರ್** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಮರಾಠ ಮಂಡಳ ಕಾಲೇಜು.

**ಡಾ.ಎಸ್.ಎಂ ರಾಯಮಾನೆ** : ಸಹಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಕೆ.ಎಲ್.ಇ, ಬಿ.ಕೆ ಕಾಲೇಜು, ಚಿಕ್ಕೋಡಿ.

**ಶ್ರೀ.ಪ್ರಕಾಶ್ ಬಿ.ನಾಗರ್ಲೆ** : ನಿವೃತ್ತ ಶಿಕ್ಷಕರು, ಮುನಿಸಿಪಲ್ ಪ್ರೌಢಶಾಲೆ, ನಿಪ್ಪಾಣಿ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

## ಉನ್ನತ ಪರಿಶೀಲನ ಸಮಿತಿ

**ಶ್ರೀ ಸರಜು ಕಾಟ್ಕರ್** : ಮಹಾಂತೇಶ್ ನಗರ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಶ್ರೀ ರಾಮಕೃಷ್ಣ ಮಾರುತಿ ಮರಾಠೆ** : ಶ್ರೀಕಲ್ಪ , ಶಾಂತಿ ನಿಕೇತನ, ಟೀಚರ್ಸ್ ಕಾಲೋನಿ, ಬೆಳಗಾವಿ.

**ಡಾ. ಗೋಪಾಲ್.ಎಸ್.ಮಹಾಮುನಿ ಅಲಿಯಾಸ್ ಸುತಾರ್** : ಪ್ರಾಧ್ಯಾಪಕರು, ಶಾಂತಿನಗರ, ಚಿಕ್ಕೋಡಿ ತಾ. ಬೆಳಗಾವಿ ಜಿಲ್ಲೆ.

### ಸಲಹೆ ಮತ್ತು ಮಾರ್ಗದರ್ಶನ:

**ಶ್ರೀ ಎಂ.ಪಿ. ಮಾದೇಗೌಡ** : ವ್ಯವಸ್ಥಾಪಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬನಶಂಕರಿ 3ನೇಹಂತ ಬೆಂಗಳೂರು–85.

**ಶ್ರೀ ಕೆ.ಜಿ. ರಂಗಯ್ಯ** : ಉಪನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ (ರಿ), ಬನಶಂಕರಿ 3ನೇ ಹಂತ, ಬೆಂಗಳೂರು–85.

### ಕಾರ್ಯಕ್ರಮ ಸಂಯೋಜಕರು:

**ಡಾ. ಸೂರ್ಯಕಲಾ** : ಸಹಾಯಕ ನಿರ್ದೇಶಕರು, ಕರ್ನಾಟಕ ಪಠ್ಯಪುಸ್ತಕ ಸಂಘ(ರಿ), ಬನಶಂಕರಿ 3ನೇ ಹಂತ ಬೆಂಗಳೂರು–85.



# इयत्ता-पहिली - पाठ्यपुस्तक रचनाक्रम

## अनुक्रमणिका

## (पाठ्य पुस्तकासह लेखन पुस्तिका)


| अ.नं. | पाठ्यांश सराव/लेखन | संख्या | विवरण | पृ.क्रं. |
|---|---|---|---|---|
| 1. | ओळख/परिचय | 7 | माझा परिचय, वर्गमित्र मैत्रिणींचा परिचय, आम्ही आहोत शहाणीमुले,; रंगाची ओळख, आवाजाची गंमत मी कोण? | 1-9 |
| 2. | चित्रावरून गोष्ट | 9 | ससा व कासव, फळभाजी, कोण? पाळीव प्राणी, आवडते मित्र माझंनाव ओळख, साधन कोणते? सांगा, काम माझे सांग, यांचे कार्य सांग. | 10-18 |
| 3. | बडबड गीते | 5 | फुलांची ओळख परडी भरूया, अंकांचे गाणे, मैसूरुची बाग, असरट पसरट केळीचे पान. | 19-25 |
| 4. | चित्रावरून गोष्ट - 1 | 1 | कोल्हा व करकोचा | 26 |
| 5. | अभिनय गीते | 3 | ही चव कोणाची, रसदार फळे, आनंदाने खेळूया (वस्तू परिचय) | 27-29 |
| 6. | चित्रावरून गोष्ट - 2 | 1 | मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार? (चित्रकथा) | 30 |
| 7. | आठवा पाहू | - | प्रश्नावली | 31 |
| 8. | अक्षरांचे अवयव | | | 32 |
| 9. | अक्षर ओळख | | | 33 |
| 10. | अक्षर वळण | | | 34 |
| 11. | कित्ता लेखन | | अंक परिचय, अंक लेखन पाठ जोडाक्षरी पाठ, पाठानुरूप शब्द खेळ- ठिपक्या पासून अक्षर, वस्तू व नाव जोडणे मधले अक्षर जोडणे आवाजाची नक्कल, ठिपक्यांची रांगोळी चित्र रंगविणे, दोन अक्षरापासून शब्द बनाविणे | 35-52 |
| 12. | स्वर व व्यंजन | | व्याकरण ओळख | 53 |



# अनुक्रमणिका


| अ.नं. | पाठाचे/कवितेचे नांव | विवरण | पृ.क्रं. |
|---|---|---|---|
| 1. | लवकर चल | - | 54 |
| 2. | बाळ पाटावर बस | - | 56 |
| 3. | दिवस उगवला | - | 58 |
| 4. | चला गावी जाऊया | वाहनांची ओळख, चला सहलीला<br>कुणाला किती चाके | 60 |
| 5. | कुसुमचा वाढदिवस | - | 64 |
| 6. | रामूला मिळाला लाडू | - | 66 |
| 7. | आपण बागेत जाऊया | - | 68 |
| 8. | कैरी | - | 70 |
| 9. | गोमती गाय | - | 72 |
| 10. | मौज | - | 74 |
| 11. | झेंडावंदन | - | 77 |
| 12. | बाराखडीचा सराव | | 80 |
| | मज्जा | | 83 |
| 13. | अक्षर | | 85 |
| 14. | जत्रा | | 86 |
| 15. | ज्योतीची मदत | | 89 |
| | शब्द संग्रह | | 91-94 |

सराव/लेखन पाठ - 1

# ओळख/परिचय

## माझा परिचय



माझे नाव .................. आहे.

माझ्या शिक्षकाचे/शिक्षिकेचे नाव .................... आहे.

माझ्या वडिलांचे नाव .................. आहे.

माझ्या आईचे नाव .................. आहे.

माझ्या गावाचे नाव .................. आहे.

**आपल्या वर्गखोलीत असलेल्या वस्तूंची चित्रे काढ.**

**उदा.**



मागील पान पहा. त्यावरील चित्रात काय आहे ? काय काय नाही ते सांग

# वर्ग मित्र-मैत्रिणीचा परिचय

येथे दोन गट आहेत.

एका गटातील मुलांच्या नावात ‘म’ आहे. दुसऱ्या गटातील मुलांच्या नावात ‘न’ आहे.



मयूर



नम्रता



माधुरी



नामदेव



मालन



नयना



मोहन



नेताजी

याप्रमाणे तुझ्या वर्गातील मुलांचे गट ओळख.

# आम्ही आहोत शहाणी मुले












# रंगांची ओळख



फुगा फुगा फुगवला
हळदीसारखा पिवळा पिवळा
कुंकवासारखा लाल लाल
पानासारखा हिरवा हिरवा
आकाशासारखा निळा निळा
कापसासारखा पांढरा पांढरा
काकडीसारखा लांब लांब
भोपळ्यासारखा गोल गोल
दोऱ्याने बांधला
आकाशात उडवला
उंच उंच गेला
फट्कन फुटला

**रंग भर.**

गाजर 


मिरची 

पान 


भेंडी 

फूल 

पुढील रेखाकृतीत रंग भर.



चित्रे पाहून त्यांचा आकार कसा आहे ते सांग.



रींग, चेंडू, बांगडी

पतंग, कॅरमबोर्ड, फळा

समोसा, ट्रँगल, पर्स

# आवाजाची गंमत



झऱ्याच्या पाण्यात झुळझुळ ताल
बैलाच्या गळ्यात घुळघुळ माळ
किणकिण बांगड्या, खुळखुळ चाळ
टिणटिण घंटा सांजसकाळ

कुईकुई मोटेची झरझर धार
थुईथुई कारंज गारच गार
गुंईगुंई भुंगा काळाशार
सुंईसुंई विमान ढगांच्या पार



वल्हव रे होडी सप् सप् सप्
आला आला पाऊस टप् टप् टप्
नको जाऊ चिखलात रप् रप् रप्
नको चालू जोरात धप् धप् धप्

जा ना गं, मनीमाऊ शुक शुक शुक
दूध पिते, तुला मात्र टुक टुक टुक
आई घेते पापा चुक चुक चुक
तो मला आवडतो खूप खूप खूप



## आवाजाची नक्कल कर.

1. कावळा
2. चिमणी
3. कोंबडा
4. कुत्रा
5. मांजर
6. शेळी
7. वाघ
8. कोकिळा

## वाद्य


ढोल

लेझीम

टिपरी

शाळेची घंटा

## रंग भर



# मी कोण



खात नाही विडा तरी ओठ लालेलाल
असो नसो थंडी सदा हिरवी हिरवी शाल।।
गप्पा गोष्टी करायला माझ्याकडे याल
सांगाल माझे नाव तर देईन पेरु डोळे ।।



डोळे माझे शंभर पण पहायचे दोन
नाच करितो सुंदर मी कोण? मी कोण?



अंगावरती बोटे पाच शेपुट झुपकेदार
इथून तिथे तिथून इथे माझे नाव ××× ।।

## अ. प्राण्यांच्या अवयवावरुन प्राणी ओळख

1.  ______

2.  ______

3.  ______

4.  ______

5.  ______

## आ. जोड्या जुळव.


| तोंड | शरीर |
| --- | --- |
| 1.  |  |
| 2.  |  |
| 3.  |  |
| 4.  |  |
| 5.  |  |

## सराव/लेखन पाठ - 2


# चित्रावरुन वर्णन

## चित्रावरुन गोष्ट

### ससा व कासव




1



2



3



4

# फळभाजी



या भाज्यांची नावे सांग पाहू?

तुम्ही कोणत्या भाज्या खाता?

भरीत कशाचे करतात?

काकडी आणि टोमॅटोचे काय करतात?


# कोण ? कोण ?



पहाट झाली सांगतं कोण ?
कुकुऽच कोंबडा आणखी कोण ?

उठा उठा लवकर सांगतं कोण ?
विठू विठू पोपट आणखी कोण ?





ताजं ताजं दूध देतं कोण ?
गोठ्यालील हंबा आणखी कोण ?

चोरुन दूध पितं कोण ?
म्याँव म्याँव माऊताई आणखी कोण ?





घराची राखण करतं कोण ?
भू ऽऽ भू ऽऽ कुत्रा आणखी कोण ?

बागेतली भाजी खातं कोण ?
मऊमऊ ससेभाऊ आणखी कोण ?



# पाळीव प्राणी















गोड गोड दूध देते कोण?
घराची राखण करते कोण?
चोरुन दूध पिते कोण?
दौडत दौडत आले कोण?

# आवडते मित्र

अंगणातले दाणे
टिपतं कोण?





गोष्टीत आपल्या
येतं कोण?

गुटर्रगुमऽ गुटर्रगुम
करतयं कोण?




थुई थुई नाच
नाचतयं कोण?



# माझं नाव ओळख





















# साधन कोणते ? सांग

1) कांदे चिरण्यासाठी वापरतात. ..........................

2) दही घुसळण्यासाठी वापरतात. ..........................

3) चहा गाळण्यासाठी वापरतात. ..........................

4) दूध तापविण्यासाठी वापरतात. ..........................

5) दात घासण्यासाठी वापरतात. ..........................

6) लिहिण्यासाठी वापरतात. ..........................

7) कचरा झाडण्यासाठी वापरतात. ..........................

8) वेळ पाहण्यासाठी वापरतात. ..........................

9) नखे काढण्यासाठी वापरतात. ..........................

10) केस विंचरण्यासाठी वापरतात. ..........................

11) चेहरा पाहण्यासाठी वापरतात. ..........................

12) पोळ्या लाटण्यासाठी वापरतात. ..........................






13) खोडण्यासाठी वापरतात. ..........................





14) भाकरी भाजण्यासाठी वापरतात. ..........................


# काम माझे सांग



# यांचे कार्य सांग





## सराव/लेखन पाठ - 3

# बडबड गीते

## फुलांची ओळख



काटेरी झाडावर फुलतो गुलाब
नाजूक टपोरा त्याचा रुबाब

फुले डुलतात जास्वंदीची
उधळण होते आनंदाची





सुगंध देई टपोंरा मोगरा
सतत आनंदी हसरा हसरा

सुंदर वेल जाई जुई
सर्व काळ आनंद देई






उंच झाडावर फुलतो चाफा
सुंदर दिसे ताईचा खोपा

नाजूक नाजूक शेवंती
आईच्या खोप्यावर छान दिसती





घाई करु नको रे बंडू
तोडू नकोस सुंदर झेंडू

# परडी भरुया







**सांगा हं सगळे**

फुलांचा राजा ?



तुरेवाले फूल ?

सूर्यांकडे बघते ?


तळ्यात डुलणारे ?

छान वासाचा ?



# अंकांचे गाणे



एक दोन तीन चार
भारतभूची मुले हुशार

पाच सहा सात आठ
पहा शाळेचा थाटमाट

नऊ दहा अकरा बारा
सारे मिळूनी काम करा

तेरा चौदा पंधरा सोळा
केर कचरा करु गोळा

सतरा अठरा एकोणीस वीस
झाडू मैदान ऐसपैस

लावू रोपं घालू पाणी
रक्षण करुया सारे मिळूनी

फुलांची बाग होईल छान
वाढेल आपल्या शाळेचा मान

## अ. उत्तरे सांग.

1. भारतभूची मुले कशी आहेत ?

2. मुले काम कशी करणार आहेत ?

3. मुले काय गोळा करणार आहेत ?

4. मैदान कसे करणार आहेत ?

5. रोपांचे रक्षण कसे करणार ?

6. आमच्या शाळेचा मान कसा वाढेल ?

## आ. उदाहरणात दाखविल्याप्रमाणे मोकळ्या जागी योग्य शब्द भर.

उदा. चार - हुशार

आठ - ____________________

बारा - ____________________

सोळा - ____________________

वीस - ____________________

छान - ____________________

# म्हैसूरची बाग



म्हैसूरच्या बागेत
प्राणी अजब पाहिलेत
जिराफाची लांब मान .
झाडांची पाने खातो छान




पिवळ्या पट्ट्यांचा वाघोबा
डरकाळीने घाबरु नका
सिंहाची चाल ऐटबाज
याला म्हणतात वनराज



वेगळी वेगळी वानरसेना
उड्या मारताच पळतात मैना





हत्ती आला डुलत डुलत
सोंड सारखी हलवत हलवत
चिखल पाण्यात दिसतो गेंडा
लांब त्याच्या नाकाचा शेंडा




## अ. उत्तरे सांग.


1. जिराफाची मान कशी असते ?
2. डरकाळी कोण फोडतो ?
3. वनराज कुणाला म्हणतात ?
4. कुणाला पाहून मैना पळतात ?
5. डुलत डुलत कोण येतो ?
6. कुणाच्या नाकाचा शेंडा लांब आहे ?

## आ. यांना तुम्ही पाहिलतं का ?










# असरट पसरट केळीचे पान




असरट पसरट केळीचे पान
अनूने केला स्वयंपाक छान
काढला केर, धुतले हात
मांडला पाट, ठेवले ताट
वरण भात, लिंबाची फोड
पुरी भाजी, श्रीखंड गोड
वाढलं ताटात, वाढलं वाटीत
बाहुली बसली जिभल्या चाटीत
सावकाश खावा पोटभर जेवा
अन्न नका टाकू लक्षात ठेवा

सराव/लेखन पाठ - 4

# चित्रावरून गोष्ट

## कोल्हा व करकोचा




चित्र पाहून गोष्ट सांग

## सराव/लेखन पाठ - 5

# अभिनय गीते

## ही चव कोणाची?

आंबट चिंबट सांगा लागतं कोण?
लिंबू, कैरी, चिंच आणखी कोण!






गोड गोड सांगा लागतं कोण?
साखर आणि गूळ आणखी कोण!


हाय हाय तिखट लागतं कोण?
लाल, अन् हिरवी मिरची आणखी कोण!






कडूऽ कडूऽ कऽडू लागतं कोण?
औषध आणि कारलं आणखी कोण!

खारट, खारटऽ लागतं कोण?
पांढरं शुभ्र मीठ आणखी कोण!




# रसदार फळे










चित्रात कोणकोणती
फळे दिसत आहेत?
तुला कोणते फळ
आवडते?
शिकरण कोणत्या
फळाची करतात?
फळांचा राजा कोण?
सांगा पाहू?









# आनंदाने खेळूया



आनंदाने खेळू या
खूप मजा करू या ।।धृ।।

नटून आपण घालू वेणी
कमरेवरती हात घेऊनी
ठुमकत ठुमकत चालू या ।।1।।

हातांचे हे पंख पसरुनी
नक्कल करुया चिमणीवाणी
भुर्रकन उडूनी जाऊया ।।2।।

पडता पाऊस वेचू गारा
हातांचा करु मोर पिसारा
थुई थुई थुई थुई नाचूया ।।3।।


हातांचे करु कान सशाचे
मऊ मऊ कापूस, अंग तयाचे
टुणकन उड्या मारुया ।।4।।

हाताची करु सोंड हत्तीची
लावू शेपूट त्यास दोरीची
डुलत डुलत जाऊया ।।5।।

## सराव/लेखन पाठ - 6

# चित्रावरून गोष्ट - 2

# मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार?



चित्रावरुन गोष्ट सांग.

## सराव/लेखन पाठ - 7

# आठवा पाहू


## प्रश्नावली

1. तुझ्या नावाच्या गटात आणखी कोण कोण आहेत?
2. चांगल्या सवयी कोणत्या?
3. काकडी व भोपळ्याचा आकार कसा असतो?
4. पाऊस कसा येतो?
5. आयाळ कोणत्या प्राण्याला असते?
6. शर्यत कोणाकोणामध्ये लागली?
7. फळभाज्यांची नावे सांग.
8. घराची राखण कोण करतो?
9. जवणामध्ये चवसिाडी कशाचा वापर करतात?
10. गार हवा मिळण्यासाठी काय वापरतो?
11. फुलांची नावे सांग.
12. म्हैसूरच्या बागेत कोणकोणते प्राणी आहेत?
13. भोजनासाठी कोणी कोणाला बोलाविले?
14. जवतांना कोणती खाळजी हयावी काय लक्षात ठेवावे?
15. आंबट चव कोणाकोणाची असते?
16. तुला कोणकोणती फळे आवडतात?
17. डुलत डुलत कोण चालतो?
18. कोण कुणाच्या गळ्यात घंटा बांधणार होते?
19. कोणाची मान उंच असते?
20. वनराज कुणाला म्हणतात?

सराव/लेखन पाठ - ४

## अक्षरांचे अवयव

खालील रेषा व अर्धवर्तुळे दाखविलेल्या दिशेप्रमाणे गिरव व सराव कर.




सराव/लेखन पाठ - 9

## अक्षर ओळख



बदक



कमळ

| ब | द | क | म | ळ |
|---|---|---|---|---|

**स्वाध्याय**

**1. वाच - जोड्या जुळव.**

| | | |
|---|---|---|
| (म) | क | (ळ) |
| (द) | म | (ब) |
| (क) | ळ | |
| | ब | |
| | द | |

**2. गोलातील अक्षर वाच. पुढील शब्दातील त्या अक्षराभोवती (0) गोल कर.**

(ब) बस, बटवा, अबब

(म) मदन, मगर, शाम

(द) सदन, दरवाजा, पदक


(ळ) नळ, सरळ, पळ

(क) कमान, माकड, कडक

## सराव/लेखन पाठ - 9


# अक्षर वळण

**3. पहा. गिरव आणि लिही.**




**4. आपल्या परिसरातील फुलांची नावे सांग.**

**5. उदा. प्रमाणे शब्द तयार कर.**




कळ

## सराव/लेखन पाठ - 10

# कित्ता लेखन



समई




भजन



नळ

स म ई भ ज न ळ

## वाचा व जोडा




## पुढील चौकोनातील अक्षर वाच. पुढील शब्दातील त्या अक्षराभोवती गोल कर.


| | | | | |
|---|---|---|---|---|
| स | सहल | वास | सडक | आस |
| न | नमन | नथ | छान | पान |
| ई | सनई | आई | ईश | पपई |
| भ | लाभ | भर | भट | नभ |

ज लाज जप गज भज

## बघ गिरव व लिही.

| | |
|---|---|
| स | |
| भ | |
| ई | |
| ज | |
| न | |

## नमुन्याप्रमाणे कर.





नभ

____________


____________

____________

## तू पाहिलेल्या प्राण्यांची नावे सांग.



गवत



मगर



घर

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ग | व | त | घ | र |

## स्वाध्याय

वाच व जुळव

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ग | व | घ | त | र |
| व | ग | र | घ | त |

## खालील शब्दातील ग, त, व, र, घ या अक्षराखाली रेष ओढ

| | | | | |
|---|---|---|---|---|
| नर | बाग | वाघ | तळ | सर |
| बघ | वात | साग | वजन | नग |
| जर | घट | तट | समर | जवळ |

ग

व


| | |
|---|---|
| त | - ८ त त |
| घ | ' ६ ध घ |
| र | ɿ ᕈ र |

नमुन्याप्रमाणे कर.

गा, न — जर → गाजर ______

म, जा — गर → ______ ______


भ, व — जन → ______ ______



पपई



झाड



अननस

प झ ड अ

**वाच व सारखी अक्षरे जोड**

| | | | |
|---|---|---|---|
| प | झ | ड | अ |
| झ | प | अ | ड |
| प | अ | झ | ड |
| प | अ | ड | झ |

**खालील शब्दातील प. झ, ड, अ अक्षराभोवती गोल कर**


| | | | | |
|---|---|---|---|---|
| पसा | माझ | बाप | जाड | अमर |
| साप | झरा | भडक | गड | पदर |
| अजब | झळ | जड | अकरा | झडप |
| जप | झगा | माड | अगर | झाक |

बघ गिरव व लिही

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प | | | | प | |
| झ | | | | झ | झ |
| ड | | | | ड | |
| अ | | | | अ | अ |

चौकोनातील आडवी आणि उभी अक्षरे पाहून -

उदाहरणाप्रमाणे शब्द तयार कर.




बदक

__________

__________

__________


__________

__________


## तू पाहिलेल्या पक्ष्यांची नावे सांग.



उखळ



ढग



षट्कोन

उ ख ष ट ढ


## कृती - खालील षट्कोनातील उ, ख, ष, ट, ढ,या अक्षराभोवती गोल कर

उचल, नख,
षटक, कपट, खत,
ढग, घट, उदक, टणक,
उघड, चढ

| | |
|---|---|
| उ | उ उ |
| ख | ख ख |
| ष | ष ष |
| ट | ट ट |



इमारत



फणस




इ फ ण श ह

**वाच व जोड्या जुळव.**

| | |
|---|---|
| फ | ण |
| इ | श |
| ण | ह |
| श | इ |
| ह | फ |

**पुढील चौकातील अक्षर वाच, त्या पुढील शब्दातील ते अक्षर ओळखून गोल कर**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| फ | फड | डफ | वाफ | फणस |
| इ | इतर | इसम | इलाखा | इतका |
| ण | बाण | सण | खाण | रमण |
| श | शरद | शहर | शहाजी | यश |
| ह | हरीण | हळद | हजर | हवा |

बघ गिरव व लिही.


| | |
|---|---|
| इ | इ |
| फ | फ |
| श | श |
| ण | ण |
| ह | ह |




लसूण



ऊस




गाय



थवा

| | | | |
|---|---|---|---|
| ऊ | य | थ | ल |


**खालील चित्रातील ल, थ, ऊ अक्षराभोवती गोल कर.**





**पुढील शब्दातील ल थ ऊ आणि य अक्षराभोवती गोल कर.**




यज्ञ



पाल



थडगे



ऊस

बघ व गिरव.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| य | | | य | य |
| ऊ | | उ | ऊ | ऊ |
| थ | | | थ | थ |
| ल | | | ल | ल |

नमुन्याप्रमाणे लिही.

य — वन — यवन

य — मन — ____________

ऊ — ब — ____________

ऊ — न — ____________

ऊ — द — ____________

ऊ — त — ____________

ल — बाड — ____________

ल — गाम — ____________


तुला माहीत असलेल्या खेळांची नावे सांग.



चमचा




छत्री



धरण

| च | छ | ध |
|---|---|---|

**वाच व जोड. सर्व च लाल रंगाने, छ निळ्या रंगाने, ध पिवळ्या रंगाने जोड**




**खालील शब्दातील च, छ, ध ही अक्षरे ओळखून त्यांना गोल कर.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चहा | छत | धर | वाच | नाच |
| छडी | छगन | छबी | चव | छटा |
| धरण | धन | वध | मध | धमक |

## बघ व गिरव.

च

छ

ध


## उलटे सुलटे कसेही वाच व पुन्हा लिही.

| | | | |
|---|---|---|---|
| कनक | सरस | कटक | सकस |
| कडक | नमन | नयन | मलम |

## तुमच्या स्वयंपाकघरातील वस्तुंची नावे सांग.



आई



ओठ



औषध

| आ | ओ | औ | ठ |
|---|---|---|---|

**अक्षरे वाच व जोड.**




**पुढील गोलातील शब्द वाच व त्या पुढील शब्दातील त्या अक्षराखाली रेघ ओढ.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (आ) | आदर | आई | आज | आवक |
| (ओ) | ओठ | ओम | ओणवा | ओझे |
| (औ) | औत | औटकी | औदुंबर | औपचारिक |
| (ठ) | साठ | ठक | मठ | माठ |


बघ गिरव व लिही.


| | |
|---|---|
| अ | उ अ अ |
| आ | उ अ आ आ |
| ओ | उ अ आ आ ओ |
| औ | उ अ आ आ ओ औ |
| ठ | ठ ठ |

तुझ्या शरीराच्या अवयवांची नावे सांग










एडका



ऐरण



अंगठी

| ए | ऐ | अं |
|---|---|---|

**वाच व एकसारखी अक्षरे रेषेने जोड. एका अक्षराला एक रंग वापरा.**

| | | |
|---|---|---|
| ए | ऐ | अं |
| ऐ | अं | ए |
| अं | ए | ऐ |


**खालील शब्दातील 'ए' अक्षराभोवती गोल, 'ऐ' अक्षराभोवती चौकोन व 'अं' अक्षराखाली रेष ओढ**

| | | |
|---|---|---|
| एक | अंबारी | ऐतखाऊ |
| अंत | एकटा | ऐवज |
| एकदा | अंक | ऐश |
| एकी | अंदाज | ऐपत |


## बघ गिरव व लिही.

| | |
|---|---|
| ए | ए ए |
| ऐ | ए ए ऐ |
| अं | उ अ अ अं |


## 'ए' पासून कणसाचे चित्र तयार कर व रंग भर.



## 'म' अक्षराने शेवट होणारे शब्द तयार कर



# ऐक, म्हण व वाच




**बघ, वाच व वळणदार अक्षरात लिही**

एक ________________ पेरु ________________

पेढे ________________ ठेका ________________

जेवण ________________ लेखणी ________________

## सराव/लेखन पाठ - 11

# स्वर व व्यंजन

### स्वर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ | आ | इ | ई | उ | ऊ |
| ए | ऐ | ओ | औ | अं | अः |
| ऋ | ऌ | | | | |

### व्यंजने

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| क | ख | ग | घ | ङ | |
| च | छ | ज | झ | ञ | |
| ट | ठ | ड | ढ | ण | |
| त | थ | द | ध | न | |
| प | फ | ब | भ | म | |
| य | र | ल | व | श | |
| ष | स | ह | ळ | क्ष | ज्ञ |

## पाठ 1

# लवकर चल



अमर लवकर चल.

हसन भरभर पळ.

नयन कमळ बघ.

भरत बदक बघ.

अकबर बदक धर.

# स्वाध्याय

## अ. पुढील शब्द वाच.


अमर हसन नयन भरत अकबर

बदक लवकर भरभर बघ धर

## आ. जोड्या चुळव.


| अ | ब |
|---|---|
| अमर | धर |
| हसन | बघ |
| नयन | पळ |
| अकबर | चल |

## इ. गोलातील अक्षरांना बाहेरील अक्षरे जुळवून अर्थपूर्ण शब्द तयार कर व लिही.



## पाठ 2

# बाळ पाटावर बस



बाळ पाटावर बसला.

गालात हसला.

आशा, ताट आण.

राधा, वरणभात वाढ.

ताई बाळाला भरव.

शहाणा बाळ भात खाई.

## स्वाध्याय

### अ. शब्द वाच.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पाट | ताट | भात | गालात | बसला |
| हसला | ताई | खाई | शहाणा | वाढ |


### आ. बघ व समजून घे.

उदा. बाळ ब + ा = बाळ

गाल - + ा =

भात - + ा =

### इ. चित्र बघ, काना गिरव आणि शब्द वाच



म⁝कड




झ⁝ड




ह⁝त



प⁝न



न⁝रळ



सस⁝

## पाठ 3

# दिवस उगवला



दिवस उगवला.
निशा, उषा, उठा.
किरण, बिछाना काढ.
उषा, घर झाड.
किरण आणि दिनकर,
आवार साफ करा.
घर साफ आणि आवार साफ.
हात पाय करा साफ
चला आता, फराळ करा
शिरा चिवडा खाऊ चला

## स्वाध्याय

**अ. शब्द वाच.**

| | | | |
|---|---|---|---|
| दिवस | निशा | विजया | बिछाना |
| किरण | दिनकर | शिरा | चिवडा |

**आ. पहिली वेलांटी असलेल्या अक्षराना गोल कर.**

उदा. (दि)वस (वि)जया

| | | | |
|---|---|---|---|
| हिरवा | खिसा | विळा | टिळा |
| हिरा | पिसारा | जिना | चिखल |
| विमान | निळा | खिळा | भिरभिरे |

**इ. वेलांटी गिरव. शब्द वाच आणि लिही**

निळा पिवळा

**ई. शिक्षकांच्या मदतीने नमुन्यात दाखविल्याप्रमाणे 25 शब्द तयार कर.**

नमुना ह + ि = हि हिरवा

**उ. पुढील मुद्यावरुन माहिती सांग.**

फराळाचे पदार्थ

सफाईच्या वस्तू

जेवणातील पदार्थ

## पाठ 4

# चला गावी जाऊया



गाडी आली गाडी आली.

गाडीत चढायला तयार रहा.

गाडी बघा उभी राहिली.

गीता, नीता गाडीत चढा.

शशी, रवी चटकन् चढा.

आई, मावशी लवकर चढा.

बाकावर बसा, सामान नीट लावा.

सगळी गाडीत बसली.

हिरवा बावटा पहा हालला.

गाडी चालली गावाला.

शिटी लागली वाजायला.

## स्वाध्याय

### अ. वाच.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गाडी | उभी | गीता | नीता | रवी |
| शशी | आई | मावशी | नीट | सगळी |
| बसली | चालली | | | |

### आ. बघ, वाच, सराव कर

| | | |
|---|---|---|
| ड + ई = डी | ड + ी = डी | गाडी |
| भ + ई = भी | भ + ी = भी | उभी |
| ल + ई = ली | ल + ी = ली | राहिली |

### इ. वेलांटी गिरव व वाच

| | | | |
|---|---|---|---|
| गीता | रवी | मावशी | नीट |
| सगळी | चालली | बसली | गाडी |


### ई. शिक्षकांच्या मदतीने शब्द बनव




रवी  रव + ी = रवी  काठ + ी = काठी

कव + ी =__________  गाड + ी= __________

माड + ी =__________  लाल + ी=__________

# चला सहलीला



**वरील वाहने ओळख.**


दोनचाकी वाहने कोणती ?

पेट्रोल कोणाच्या टाकीत भरतात ?

आकाशातून आपल्याला कोण नेते ?

हिरवा बावटा फडकला,

गाडी निघाली सहलीला.





# कुणाला किती चाके

सायकल 


रिक्षा 

स्कूटर 

बस 

कारगाडी 

ट्रॅक्टर 

बैलगाडी 


विमान 

(✓) अशी खूण कर.

| नाव | दोन चाके | तीन चाके | चार चाके | सहा चाके |
|---|---|---|---|---|
| सायकल | | | | |
| रिक्षा | | | | |
| कार | | | | |
| बस | | | | |
| विमान | | | | |
| ट्रॅक्टर | | | | |

पाठ 5

# कुसुमचा वाढदिवस



आज कुसुमचा वाढदिवस.
सुहास आला, सुलभा आली.
लाल गुलाबी बाहुली आणली.
माई आली, सुभाष आला.
लाल लाल फुगा आणला.
काकी आली, तुषार आला.
आजी आली, सुषमा आली.
नक्षीदार रुमाल आणला.
ताई आली, खाऊचा पुडा आणला.
वाढदिवस छानच साजरा झाला.

## स्वाध्याय

### अ. वाच.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कुसुम | सुहास | सुलभा | गुलाबी | बाहुली | सुभाष |
| फुगा | तुषार | खुळखुळा | रुमाल | खाऊ | पुडा |

### आ. बघ, शब्द कसा तयार होतो (पहिला उकार)

| | | |
|---|---|---|
| फ + उ = फु | फ + ु = फु | फुगा |
| स + उ = सु | स + ु = सु | सुलभा |
| प + उ = पु | प + ु = पु | पुडा |

### इ. पहिला उकार गिरव व शब्द पुन्हा लिही.

गुलाल - गुलाल

मुलगा - ____________

रुमाल - ____________

खुळखुळा - ____________

### ई. पहिल्या अक्षराला पहिला उकार जोडून शब्द बनव.

दकान ____________

कमार ____________

बधवार ____________

## पाठ 6

# रामूला मिळाला लाडू



रामू परसात पळू लागला.

शरयू नाचू लागली.

रामू पकडा पकडी करताना पडला.

रामूचा पाय दुखू लागला.

रामू रडू लागला.

शरयू रामूला उचल, रुमाल आण.

पाय पूस. मलम लाव.

यमू, घरातून लाडू आण.

रामू हा लाडू खा.

लाडू खाताना रामू हसू लागला.

## स्वाध्याय

### अ. वाच.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रामू | पळू | नाचू | दुखू | रडू |
| शरयू | पूस | यमू | हसू | घरातून |

### आ. उकार गिरव.

ळ + ऊ = ळू          ळ + ू = ळू   पळू

म + ऊ = मू          म + ू = मू   रामू

### इ. दुसरा उकार जोड

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| लाड | - | लाडू | पळ | - | |
| पळ | - | | धाव | - | |
| रड | - | | वाच | - | |

### ई. शब्द बनव (दुसरा (उकार).

__________ राम______          __________हस___________

__________ पळ ______          __________यम___________

________ दुख________          __________नाच_____________

__________ लाड________          __________चाक___________

## पाठ 7

# आपण बागेत जाऊ



ही पहा बाग.
जिकडे तिकडे झाडेच झाडे.
फुलझाडे आणि फळझाडे.
फुलझाडे फुलली आहेत.
सगळीकडे सुवास सुटला आहे.
बागेत आहे एक तळे.
यात बदके आणि कमळे.
आपण झाडाखाली बसू.
माळीदादाने दिलेले पेरु खाऊ.
बाग दिसते हिरवीगार.
फिरताना वाटते मजा फार.

## स्वाध्याय

### अ. वाच.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जिकडे | तिकडे | झाडे | फुलझाडे | फळझाडे |
| आहे | बागेत | तळे | कमळे | बदके |
| पेरु | दिलेले | दिसते | वाटते | |

### आ. बघ, वाच व पुन्हा लिही.

| | | | |
|---|---|---|---|
| ड + ए = डे | ड + े = | डे | झाडे |
| प + ए = पे | प + े = | पे | पेरु |
| ळ + ए = ळे | ळ + े = | ळे | तळे |

### इ. वाच, विचार कर व सांग.

| | | |
|---|---|---|
| एक झाड - दोन झाडे | एक कमळ - पाच | ________ |
| एक मूल - चार मूले | एक फूल - ढीगभर | ________ |
| एक गरा - दहा गरे | एक पान - अनेक | ________ |

### ई, दुसऱ्या अक्षरावर े (मात्रा) देऊन वाच.

घर, पान, फळ, नख, झाड

### उ. पहिल्या अक्षरावर े (मात्रा)देऊन वाच व लिही.

| | |
|---|---|
| शण ________ | पन ________ |
| पज ________ | कर ________ |
| घर ________ | शर ________ |

## पाठ 8

# कैरी



वैशाली, हे पैसे घे.

बाजारातून भाजी व कैरी आण.

शैला, नैनालाही घेऊन जा.

वैशाली शैलाबरोबर बाजारात गेली.

भाजी व कैरी घेऊन आली.

वैभवने कैरी खसाखसा धुतली.

कैलासने चाकूने कराकरा कापली.

शैलाने कैरीला तिखट मीठ लावले.

सगळेजण कैरी खाऊ लागले.

कैरी लागली फारच छान.

चैन झाली हरपले भान.

## स्वाध्याय

### अ. वाच व लिही

पैसे कैरी शैला वैशाली कैलास चैन

### आ. बघ, वाच व पुन्हा लिही.

क + ऐ = कै    क + ै = कै    कैरी

म + ऐ = मै    म + ै = मै    मैना

ब + ऐ = बै    ब + ै = बै    बैठक

व + ऐ = वै    व + ै = वै    वैभव


### इ. पहिल्या अक्षरावर दोन ै (मात्रा) दे व वाच.

कफ, चन, सल, गर, मल, जव, वर, बल

### ई. शिक्षकांच्या मदतीने योग्य अक्षरावर ै लिही व वाच.


मदान, कवारी, पलवान, नतिक, सनिक, वरण, दनिक

### उ. शब्द बनव व लिही.



## पाठ 9

# गोमती गाय



ही पहा गोमती गाय.

हे पहा गोमतीचे वासरु.

याचे नाव गोरा.

गोरा कसा छानदार दिसतो.

गोमती पण गोरी गोमटी दिसते.

हिरवा चारा खाऊन भरपूर दूध देते.

गाईचे दूध लहान थोराना आवडते.

दुधापासून दही, ताक, लोणी व तूप करतात.

गाईला माता मानतात.

गोमातेची पूजा करतात.

गोडगोड पुरणपोळी खाऊ घालतात.

## स्वाध्याय

### अ. वाच.

गोमती गोरा दिसतो गोमटी थोराना

लोणी मानतो गोड पोळी गोरी

### आ. बघ, वाच, लिही.

ग + ओ = गो   ग + ो = गो   गोरा

ल + ओ = लो   ल + ो = लो   लोणी

प + ओ = पो   प + ो = पो   पोळी

### इ. लवकर लवकर म्हण.

1. मोठं नाणं लहान नाणं
2. काळे कावळे पांढरे बगळे.
3. काळे राळे गोरे राळे.

### ई. काना, मात्रा गिरवून वाच.

मोदक, खोबरे, चोच, छोटा, झोपडी,

टोपी, ढोल, नोकर, घोडा, होळी

### उ. शब्द बनव व लिही. ‘‘को‘‘ वरून 3 अरी शब्द बनवा व लिही.




उदा. कोमल ____________

____________ ____________

____________ ____________

____________ ____________

## पाठ 10

# मौज



दौलत, कौमुदी, गौतम हे माझे सोबती.

रविवारी सकाळी लवकर दौलतकडे गेलो.

दौलतचे घर कौलारु आहे.

घरासमोर चौकोनी हौद आहे.

हौदात भरपूर पाणी होते.

सगळेजण हौदाजवळ गेलो.

हौदाजवळ खेळू नका असे बाबा म्हणाले.

बागेत फुलझाडे डौलाने डुलत होती.

बागेत खेळताना मौज वाटली.

## स्वाध्याय

### अ. वाच.

दौलत कौमुदी गौतम कौलारु

चौकोनी हौद डौलाने मौज

### आ. बघ, वाच व लिही.

| | | |
|---|---|---|
| द + औ = दौ | द + ौ = दौ | दौलत |
| ह + औ = हौ | ह + ौ = हौ | हौद |
| क + औ = कौ | क + ौ = कौ | कौलारु |

वरील प्रमाणे शब्द तयार कर

### इ. काना व मात्रा गिरव. शब्द पुन्हा लिही.

गौरी - गौरी

| | |
|---|---|
| चौकट - | पौष - |
| डौल - | फौज - |
| दौत - | लौकिक - |
| नौका - | सौरभ - |

## ई. जोड्या जुळवून शब्द तयार कर.

| ‘अ’ | ‘ब’ |
|---|---|
| चौ | द |
| मौ | क |
| सौ | ज |
| हौ | र |

## उ. वाचनाचा सराव कर.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कौ | खौ | गौ | घौ | ङौ | |
| चौ | छौ | जौ | झौ | ञौ | |
| टौ | ठौ | डौ | ढौ | णौ | |
| तौ | थौ | दौ | धौ | नौ | |
| पौ | फौ | बौ | भौ | मौ | |
| यौ | रौ | लौ | वौ | शौ | |
| षौ | सौ | हौ | ळौ | क्षौ | ज्ञौ |

## पाठ 11

# झेंडावंदन

आज झेंडावंदन आहे.

शाळेची घंटा वाजली, लवकर चला.

शाळेचे पटांगण सुंदर आहे.

समोर उंच खांब आहे.

खांबावर झेंडा चढवला आहे.

रांगेत सरळ उभे रहा.

झेंडा फडकला, वंदन करा.

आपला झेंडा तिरंगी आहे.

वर केसरी, मध्ये पांढरा, खाली हिरवा.

झेंडा उंच फडकत आहे.

बोला वंदे मातरम्!

भारतमाता की जय!!

## स्वाध्याय

### अ. वाच.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| झेंडावंदन | घंटा | पटांगण | उंच | |
| खांब | रांगेत | तिरंगी | पांढरा | वंदे |


### आ. बघ, वाच व लिही.

| | | |
|---|---|---|
| क + अं = कं | क + ं = कं | कंप |
| ख + अं = खं | ख + ं = खं | खंदक |
| प + अं = पं | प + ं = पं | पंखा |
| फ + अं = फं | फ + ं = फं | फांदी |

### इ. योग्य अक्षरावर अनुस्वार देऊन शब्द वाच

| | | | |
|---|---|---|---|
| पतग, | नदन, | सगत, | कगण |
| चगळ, | बदर, | अभग, | आनद |
| गाधील, | डोगर, | वादग, | सुरवट |
| मदमद, | सुदर, | जगल, | मदिर |


### ई. शब्द तयार कर व लिही



उ. वाचनाचा सराव कर.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कं | खं | गं | घं | ङं | |
| चं | छं | जं | झं | ञं | |
| टं | ठं | डं | ढं | णं | |
| तं | थं | दं | धं | नं | |
| पं | फं | बं | भं | मं | |
| यं | रं | लं | वं | शं | |
| षं | सं | हं | ळं | क्षं | ज्ञं |

ऊ. झेंड्याचे चित्र काढ व रंग भर.



# बाराखडीचा सराव

**खालील अक्षरांची बाराखडी तयार कर.**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | – | क | ख | ग | घ | च | छ | ज | झ | ट | ठ |
| आ | ा | का | खा | | | | | | | | |
| इ | ि | कि | खि | | | | | | | | |
| उ | ु | कु | खु | | | | | | | | |
| ऊ | ू | कू | खू | | | | | | | | |
| ए | े | के | खे | | | | | | | | |
| ऐ | ै | कै | खै | | | | | | | | |
| ओ | ो | को | खो | | | | | | | | |
| औ | ौ | कौ | खौ | | | | | | | | |
| अं | ं | कं | खं | | | | | | | | |
| अः | ः | कः | खः | | | | | | | | |

| ड | ढ | ण | त | थ | द | ध | न | प | फ | ब | भ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |


| म | य | र | ल | ब | श | ष | स | ह | ळ | क्ष | ज्ञ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

**पुढील शब्द वाच व लिही.**

अननस, आरसा, पिसारा, मीठ, कुदळ, लसूण, खेळ, कैरी, पोपट, गौरी, रंग

## पाठ 12

# मज्जा



गब्बर, निलव्वा, सोमय्या आले.
घराच्या गच्चीवर सारे जमले.
साऱ्यानी मिळून गम्मत केली.
दुधाचे घट्ट दही बनवले.
दह्याचा चक्का तयार केला.
साखर घालून श्रीखंड केले.
श्रीखंड सारे गट्ट केले.
साऱ्यांचे पोट गच्च भरले.
मज्जा करून घरी गेले.

## स्वाध्याय

### अ. वाच.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गब्बर | निलव्वा | सोमय्या | घराच्या | गच्चीवर |
| साऱ्यांनी | गम्मत | घट्ट | चक्का | दह्याचा |
| श्रीखंड | गट्टू | गच्च | मज्जा. | |

### आ. बघ, समजून घे आणि वाच.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क् | + | क | = | क्क | टक्कर | प् | + | प | = | प्प | गप्प |
| ड् | + | ड | = | ड्ड | खड्डा | ऱ् | + | य | = | ऱ्य | पऱ्या |
| ट् | + | ट | = | ट्ट | घट्ट | ल् | + | ल | = | ल्ल | सल्ला |
| न् | + | न | = | न्न | अन्न | स् | + | स | = | स्स | रस्सा |
| द् | + | द | = | द्द | रद्द | | | | | | |

### इ. योग्य अक्षरास कंसातील योग्य अक्षर जोडून शब्द तयार कर.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| उच | (क, च, प) | ________ | गप | (स, ड, प) | ________ |
| उतर | (त, व, ल) | ________ | चकर | (क, त, स) | ________ |
| चिलर | (ल, ष, म) | ________ | घट | (ख, प, ट) | ________ |
| नकल | (ग, क, घ) | ________ | मठ | (ठ, ड, व) | ________ |

### ई. वाचनाचा सराव कर.

क्क, ख्ख, ग्ग, घ्घ

च्च, छ्छ. ज्ज झ्झ

ट्ट, ठ्ठ, ड्ड, ढ्ढ, ण्ण

त्त, थ्थ, द्द, ध्ध, न्न

प्प, फ्फ, ब्ब, भ्भ, म्म


य्य, र्र, ल्ल, व्व, श्श,

ष्ष, स्स, ह्ह, ळ्ळ

# पाठ 13

## अक्षर

ऋ



ऋषी

क्ष



क्षत्रिय

ज्ञ



ज्ञानमंदिर

**स्वाध्याय**

### शब्द वाच आणि लिही.

| | | | |
|---|---|---|---|
| क्षण | अक्षर | पक्षी | राक्षस |
| लक्ष | क्षमा | भिक्षा | रक्षण |
| ज्ञान | ज्ञानदा | सुज्ञ | आज्ञा |
| यज्ञ | जिज्ञासा | सज्ञान | विज्ञान |
| ऋतू | ऋषी | ऋण | ऋतुजा |

### वेदवाक्य लिपणो

अक्षर गिरवा, अज्ञान घालवा.

ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा.

ज्ञान हेच धन.


क्षणाक्षणाला ज्ञान वाढते.

ज्ञानी जनता भूषण भारता.

सूचना : **अशा प्रकारची बोधवाक्ये मिळवून मुलांच्याकडून वाचून व लिहून घ्यावीत.**

# पाठ 14

## जत्रा



शुक्रवारी गावची जत्रा होती.

अनेक प्रकारची खेळणी होती.

प्रतापने लहानसा कुत्रा आणला.

नम्रताने बाहुली आणली.

सुप्रियाने छोटी पर्स घेतली.

सुदर्शनने रबरी ट्रक घेतला.

एके ठिकाणी जादूचे प्रयोग चालू होते.

सर्वजण ते पाहण्यात गर्क झाले.

छोटीशी सर्कसही आली होती.

अपर्णा पाळण्यात बसली.

सर्वांनी जत्रेचा आनंद लुटला.

## स्वाध्याय

### अ. वाच.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शुक्रवारी | जत्रा | प्रकार | सर्कस | कुत्रा |
| प्रताप | नम्रता | सुप्रिया | पर्स | ट्रक |
| प्रयोग | सर्वजण | गर्क | अपर्णा | सर्व |

### आ. बघ, समजून घे.

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क् | + | र | = | क्र | म् | + | र | = | म्र | र् | + | क | = | र्क |
| र् | + | व | = | र्व | त् | + | र | = | त्र | ट् | + | र | = | ट्र |
| र् | + | स | = | र्स | र् | + | ण | = | र्ण | प् | + | र | = | प्र |
| ज् | + | र | = | ज्र | र् | + | प | = | र्प | | | | | |

### इ. खालील प्रश्नांची उत्तरे सांग.

1. जत्रा केंव्हा होती ?
2. कुत्रा कोणी आणला ?
3. नम्रताने काय घेतले ?
4. पर्स कोणी घेतली ?
5. सर्वजण कशात गर्क होते ?
6. पाळण्यात कोण बसली ?
7. तू जत्रेत काय काय घेतले असतेस ?

## ई. खालील जोडाक्षरे समजून घे. वाच व सराव कर.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र | ख्र | ग्र | घ्र | | प्र | फ्र | ब्र | भ्र | म्र |
| च्र | छ्र | ज्र | झ्र | | य्र | र्र | ल्र | व्र | श्र |
| ट्र | ठ्र | ड्र | ढ्र | ण्र | ष्र | स्र | ह्र | | |
| त्र | थ्र | द्र | ध्र | न्र | | | | | |

## उ. खालील शब्द वाच व सराव कर.

क्रम व्याघ्र वज्र ट्रक ड्रम त्रास

द्रव प्रत फ्रेम ब्रश भ्रम आम्र व्रण

## ऊ. खालील जोडाक्षरे समजून घे वाच व सराव कर.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| र्क | र्ख | र्ग | र्घ | | र्प | र्फ | र्ब | र्भ | र्म |
| र्च | र्छ | र्ज | र्झ | | र्य | र्र | र्ल | र्व | र्श |
| र्ट | र्ठ | र्ड | र्ढ | र्ण | र्ष | र्स | र्ह | | |
| र्त | र्थ | र्द | र्ध | र्न | | | | | |

## ए. खालील शब्द वाच व सराव कर.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कर्क | | वर्ख | | मार्ग | | मार्च | |
| आर्जव | | चार्ट | | कार्ड | | वर्ण | |
| आर्त | | अर्थ | | मर्द | | कर्ण | |
| सर्प | | बर्फ | | अर्भक | | कर्म | |
| पर्यंत | | तर्र | | सर्व | | पर्स | |
| आर्हता | | | | | | | |

## पाठ 15

# ज्योतीची मदत



ज्योतीने घाईने घड्याळात पाहिले.
ती बगीच्यात खेळायला निघाली.
वाटेत तिला जोसेफ भेटला.
ती दोघं रस्त्याच्या डाव्या बाजूने चालली.
एक मुलगी चाचपडत चालली होती.
दोघानी समोरच्या मुलीला पाहिले.
त्या मुलीला दिसत नव्हते.
म्हणजे ती अंध होती.
तिला दोघांनी रस्ता ओलांडण्यास मदत केली.
अंध मुलीला थोडा वेळ सहारा मिळाला.
ती आनंदित झाली

## स्वाध्याय

### अ. वाच.

ज्योती    घड्याळ    डाव्या    समोरच्या

म्हणजेच    ओलांडण्यास.

### आ. बघ, समजून घे.

| | | |
|---|---|---|
| क् + र = क्र | म् + र = म्र | र् + क = र्क |
| ड् + या = ड्या | च् + या = च्या | म् + ह = म्ह |
| व् + या = व्या | स् + त् + या = सत्या | ण् + या = ण्या |
| स् + ता = स्ता | ज् + या = ज्या | |

### इ. खालील प्रश्नांची उत्तरे सांग.

1. ज्योती कोठे जात होती ?
2. वाटेत तिला कोण भेटले ?
3. ती रस्त्याच्या कोणत्या बाजूने चालली ?
4. त्यांना समोर कोण दिसले ?
5. त्यांनी तिला कशी मदत केली ?
6. तू काय केलं असतंस ?

### ई. पहा. वाच आणि वळणदार अक्षरात लिही.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| चिवडा | | पणती | | जिराफ | |
| चटणी | | पिवळा | | फीत | |
| चिवचिव | | वाटी | | फिका | |
| कडी | | तिफण | | सजीव | |



# शब्दसंग्रह

## अ
अमर
अबब
अजब
अगर
अकबर
अक्षर
अपर्णा
अर्थ
अर्भक
अर्हता
अंध

## आ
आत
आदर
आज
आवक
आपण
आवार
आई
आहे
आण
आली
आशा
आणि
आज्ञा
आग्रह
आनंदी
आम्र
आर्जव
आर्त

## इ
इतर
इसम

## ई
ईश

## उ
उचल
उदक
उघड
उखळ
उगवला
उठा
उभी

## ऊ
ऊस

## ए
एडका
एक
एकटा
एखादा
एकी

## ऐ
ऐरण
ऐतखाऊ
ऐवजी
ऐश
ऐपत

## ओ
ओढ
ओम्
ओणवा
ओझे
ओठ
ओलांडणे

## औ
औदुंबर
औटकी
औत
औषध

## अं
अंक
अंगण
अंदाज
अंगठी
अंबारी
अंत

## क
कमळ
कमल
कनक
कडक
कटक
कपट
कमान
कर्ण
कर्म
कर्क
काकी
किरण
कुसुम
कुत्रा
केसरी
कैरी
कैलास
कौलारू
कौमुदी
क्रम

## ख
खत
खसखस
खप
खार
खाऊ
खाई
खाताना
खांब
खिळा
खुळखुळा

## ग
गवत
गज
गड
गट्ट
गच्च
गम्मत
गब्बर
गर्क
गच्ची
गाय
गाडी
गाल
गीता
गुलाबी
गोड
गोरा
गोमती
गोमटी
गोडगोड
गौतम

## घ
घर
घट
घट्ट
घड्याळ
घंटा

## च
चढ
चव
चल
चहा
चक्का
चमचा
चारा
चाहूल
चाकू
चार्ट
चिखल
चिवडा
चैन
चौकोनी

## छ
छत
छडी
छत्री
छगन
छाया
छानदार

## ज
जप
जत्रा
जवळ
जाड
जिना
जिज्ञासा
जिकडे
ज्योती

## झ
झळ
झरा
झगा
झाड
झेंडा
झेंडावंदन

## ट
टणक
टिळक
ट्रक

## ठ
ठक
ठाऊक

## ड
डफ
डाव्या
डौलाने
ड्रम

## ढ
ढग

## त
तट
तळे
तर्र
ताट
ताई
त्रास
तिरंगी
तिखट
तिकडे
तुषार

## थ
थवा
थडगे
थोर

## द
दही
दरवाजा
दिसतो
दिवस
दिलेले
दिनकर
दु:ख
दूध
दौलत
द्रव

## ध

धन
धर
धरण
धार
धाक
धीर

## न

नळ
नथ
नभ
नर
नख
नमन
नयन
नम्रता
नक्षीदार
नाव
नाच
निशा
निळा
नीट
नीता
नीलव्वा

## प

पळ
पर्स
पक्ष
पदक
पपई
पदर
पर्यंत
पट्कन
पटांगण
पान
पाट
पाय
पाल
पाणी
पिसारा
पुडा
पूजा
पुरणपोळी
पेरु
पैसे
पांढरा
प्रकार
प्रताप
प्रयोग
प्रत

## फ

फणस
फराळ
फळझाडे
फुगा
फुलझाडे
फ्रेम

## ब

बस
बघ
बर्फ
बदक
बटवा
बसली
बरोबर
बाग
बाळ
बाबा
बाण
बाहुली
बाजार
बिछाना
ब्रश

## भ

भर
भट
भरव
भजन
भरत
भडक
भरभर
भरपूर
भान
भात
भाषा
भाजी
भारतमाता
भिक्षा
भ्रम

## म

मध
मगर
मदन
मलम
मज्जा
मर्द
मांजा
माझा
माड
माठ
माई
माळी
मार्ग
मार्च
मानतो
मावशी
मौज

## य

यश
यज्ञ
यम

## र

रवी
रड्डू
रस्ता
रक्षण
रामू
राक्षस
रुमाल
रांग

## ल
लक्ष
लहान
लगोरी
लवकर
लाल
लाभ
लाज
लाडू
लोणी

## व
वज्र
वर्ण
वर्ख
वरण
वाढ
वाटते
विजया
विज्ञान
वैशाली
वंदे
व्रण
व्याघ्र

## श
शशी
शरयू
शहाणा
शिरा
शैला
शुक्रवार

## ष
षटक
षट्कोन

## स
सर
सर्व
सर्प
सदन
सरळ
सरस
सहल
सकट
सडक
सनई
समई
समर
सर्कस
सहारा
सज्ञान
सगळी
सकाळ
सर्वांनी
समोर
साफ
साठ
सामान
साजरा
साऱ्यांनी
सुंदर
सुभाष
सुलभ
सुहास
सुप्रिया
सुज्ञ
सोबती
सोमय्या

## ह
हर
हसू
हरण
हळद
हजर
हसन
हरला
हरपले
हिरा
हिरवा
हौद

## क्ष
क्षण
क्षमा

## ज्ञ
ज्ञान
ज्ञानदा
ज्ञानमंदिर

## ऋ
ऋषी
ऋण
ऋतू
ऋतूजा

## श्र
श्रीखंड

